मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित/विना अनुदानित/ अंशत:अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता तक्रार निवारण समिती गठित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: तक्रार २०१९/प्र.क्र ७५/टीएनटी ४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: - २९ ऑगस्ट, २०१९

वाचा:-समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २० जुलै,२०१९

प्रस्तावना:

महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७ मधील कलम ८ अन्वये शाळा न्यायधिकरणाची तरतूद करण्यात आली आहे. शाळा न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात न येणा-या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी सद्यस्थितीत कोणतीही औपचारीक व्यवस्था अस्तित्वात नाही. खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्याची व्यवस्था नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाविरुध्द दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक ११६१३/२०१४ व २५२७/२०१७ मध्ये निर्णय देताना मा. न्यायालयाने शालेय शिक्षण विभागास देखिल तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.१८.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांच्या तक्रारीवर कार्यवाहीसाठी तक्रार निवारण समिती गठित करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर शालेय शिक्षण विभागातील खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तक्रार निवारण समिती वाचा येथील दिनांक २० जुलै,२०१९च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली होती.मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र.२००२ ची ४०५ व इतर सलग्न याचिका व २००३ ची १५६ व इतर सलग्न याचिका व उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्र. २०१९ ची ५११० मध्ये दिलेल्या निर्देशांची पूर्तता करणे आवश्यक असल्याने वाचा येथील समक्रमांकाचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. सुधारीत तक्रार निवारण समिती गठित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय:-

मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित/विना अनुदानित/अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रत्येक विभागीय स्तरावर तक्रार निवारण समित्या गठित करण्यात येत आहेत:-

अ.क्र	अधिकाऱ्याचे पदनाम	पदनाम
१.	संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक	अध्यक्ष
२.	सहायक संचालक,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय	सदस्य सचिव

२. दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तक्रार निवारण समिती तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत कायद्यानुसार तक्रारीची सुनावणी घेऊन त्यावर कारणमिमांसेसह निकाल देईल. असा निकाल देताना शासन धोरण, संबंधित अधिनियम/ अधिसूचना, शासन निर्णय /परिपत्रक /आदेश, विषयांशी संबंधित न्याय निर्णय हे विचारात घेण्यात यावेत.

३. तक्रार निवारण समितीच्या व्यवस्था व कार्यपध्दतीबाबत आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी स्वतंत्र सूचना निर्गमित कराव्यात.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१४३६३६७०२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

JAYSING SHIVAJI RASKAR

Digitally signed by JAYSING SHIVAJI RASKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=04640d2030eaa3854379434ab85482042a072e8a601095b5f7aa8d67b9b02db2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=d5875ae525f225286aa1bc9a2e0f8cb0a86bc5ba02f01b0f5cb7c718d820e722, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=JAYSING SHIVAJI RASKAR
Date: 2019.08.29 14:42:21 +05'30'

(ज. शि. रासकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन,मुंबई (दोन प्रती)
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय मुंबई.
३. मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे सचिव,
४. शिक्षण आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे.
५. शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
८. सर्व सहायक संचालक,सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय.
९. सर्व शिक्षणाधिकारी /शिक्षण निरिक्षक.

१०.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
११.सह सचिव (विधी) शालेय शिक्षण विभाग.
१२.सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग.
१३.निवड नस्ती/टीएनटी-४.